पुणे महानगरपालिका

*** स्थायी समिती ***

कार्यपत्रिका क्रमांक ५४

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **गुरुवार दि. १२/३/२००९** रोजी सकाळी ११:३० (साडे अकरा) वाजता **म.जोतिबा फुले सभागृहात** (स्थायी समिती सभागृहात) भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

**मा.सभासदांचे प्रस्ताव**

**विषय क्र. २२७६**

मा.सौ.कविता वैरागे यांचे दि. ४/३/२००९ चे पत्र.

वॉर्डस्तरीय निधीतून विकास कामे करताना खाजगी सोसायटी अंतर्गत कामे करता येत नाहीत. मात्र आमदार निधीमधून अशी कामे करणेसाठी शासनाकडून खास बाब म्हणून मान्यता देण्यात येते. ज्याप्रमाणे आमदार निधीतून खाजगी मिळकतीमध्ये किंवा अंतर्गत सोसायटयांमध्ये रस्ते, डांबरीकरण इत्यादी कामे करण्यास शासन मान्यता देते त्याच धर्तीवर तसेच निकष वॉर्डस्तरीय निधीतून मा.सभासदांच्या वॉर्डात खाजगी सोसायटी अंतर्गत व जुन्या वाड्यांची कामे करण्यासाठी शासनाची योग्य ती मान्यता घेण्यात यावी.

**विषय क्र. २२७७**

मा.सौ.सुलोचना तुपे यांचे दि. ५/३/२००९ चे पत्र.

वॉर्ड क्र. ९३ साधना विद्यालयमधील सानेगुरुजी रुग्णालयापासून जुना कवडीमार्ग कॅनॉलपर्यंत ६० फुटी डी.पी.रस्ता विकसित करणे व कॅनॉलवर पूल बांधणेकामी मे.राहूल कन्स्ट्रक्शन (टेंडर र.रुपये १९,९०,९५६/- पेक्षा ३२.११% कमी) यांना रुपये १३,५१,६६०/- पर्यंत काम करण्याचा सभा क्र. ९४ व ठराव क्र. २२७६ दि. २६/२/२००९ रोजी ठराव मान्य झाला आहे. परंतु सदर काम करणेसाठी मान्य केलेली रक्कम अपूरी पडत आहे.

तरी सानेगुरुजी रुग्णालयापासून जुना कवडीमार्ग कॅनॉलपर्यंत ६० फुटी डी.पी.रस्ता विकसित करणे व कॅनॉलवर पूल बांधणेकामी र.रुपये २० लाख रुपये मंजूर करण्यात यावे.

**विषय क्र. २२७८**

मा.विरेंद्र किराड व मा.ॲड.अविनाश साळवे यांचे दि. ५/३/२००९ चे पत्र.

स्थायी समिती ठराव क्र. २१५५ दि. १७/२/२००९ (कोथरुड येथील टी.डी.आर.घोट्याळ्याबाबत) हा ठराव स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन नसून विसंगत आहे. त्यामुळे स्थायी समितीमध्ये पुन्हा चर्चा होणे गरजेचे आहे. त्याकरीता सदर ठरावाचा फेरविचार करण्यात यावा व तोपर्यंत सदरचा विषय मा.मुख्य सभेकडे पाठविण्यात येऊ नये.

UnRegistered

**माहितीसाठी आलेले विषय**

**विषय क्रं. २२७९**

दि. ९/२/२००९ ते दि. १५/२/२००९ अखेर संपणाऱ्या आठवड्यात पुणे म.न.पा.च्या हद्दीत लागलेल्या एकुण ५१ आगींबाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांनी पत्र क्र. मआ/अशाद/१४४३ दि. २१/२/२००९ ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

**विषय क्र. २२८०**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५(१) अन्वये दि. ४/१०/२००८ अखेर संपलेल्या आठवडयाचा तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०६(१) (अ) अनुसरुन दि. ३१/१/२००९ अखेर संपणाऱ्या आठवडयाचा मा.मुख्य लेखापरिक्षक यांनी क्रं. मुलेप/७९६ दि. २४/२/२००९ ने पाठविलेला अहवाल तसेच या आठवड्यात मा.मुख्य लेखापरिक्षक यांनी त्यांच्या पत्रात नमूद केलेल्या विविध खात्याकडील आढळून आलेली वसूलपात्र रक्कम रुपये ८३,४६,४२७/- चा तक्ता माहितीसाठी.

**विषय क्र. २२८१**

पुणे, पेठ बिबवेवाडी स.नं. ६१५/२+३+४+५+६+७+८/१ येथील २४ मी.डी.पी.रस्तारुंदीत बाधित क्षेत्राच्या भूसंपादनाची योजना मा.भुमि संपादन अधिकारी क्र. १६, पुणे यांचेमार्फत सुरु असून संयुक्त मोजणी व अधिसूचना होणेवर प्रलंबित आहे. म्हणजेच प्राथमिक अवस्थेत आहे आणि सदर मिळकतीच्या सुमारे १८९३.०५ चौ.मी. क्षेत्राचा ताबा भूमिप्रापण कार्यालयामार्फत पुणे महानगरपालिकेस मिळालेला आहे. यामुळे मिळकतीचा भूसंपादनाचा उद्देश पूर्ण झालेला आहे. त्यानुसार सदर मिळकत भूसंपादनाच्या कार्यवाहीतून वगळणेबाबत मा.जिल्हाधिकारी, भूसंपादन शाखा, पुणे मा.विशेष भूमि संपादन अधिकारी क्र. १६, पुणे व विकास योजना, पुणे महानगरपालिका यांना कळविण्यात येत असल्याची बाब अवलोकनार्थ सादर करणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/विका(भूप्रा)/१४६५ दि. २५/२/२००९ चे पत्र.

**विषय क्र. २२८२**

कोथरूड स.नं.१४३/१, १४३/२, १४४/१+२ व १४३/३, १४४/३ या जमिनीवरील टी.डी.आर घोटाळ्याच्या अनुषंगाने १) श्री.दिपक भालचंद्र कुलकर्णी, (निलंबित) सहाय्यक अभियंता, भूमिप्रापण विभाग २) श्री.दत्तात्रय भानुदास तांबारे ( निलंबित ) कनिष्ठ अभियंता, येरवडा क्षेत्रिय कार्यालय, (तत्कालीन कार्यरत भूमिप्रापण विभाग) ३) श्री. मधुसुदन श्रीरंग येनकर ( निलंबित ) कनिष्ठ अभियंता, बांधकाम नियंत्रण ( तत्कालीन कार्यरत टीडीआर सेल ) ४) श्री.रविंद्र निवृत्ती थोरात ( निलंबित ), विधि सल्लागार, ५) श्री.सीताराम चिंतू कडू, मेंटेनन्स सर्व्हेअर, भूमि व जिंदगी विभाग व ६) श्री.चंद्रसेन तुळशीराम नागटिळक, कनिष्ठ अभियंता, विकास अभियंता (पाणी पुरवठा) यांचेविरुध्द मे.न्यायालयात अभियोग दाखल करण्यास मंजुरी मिळणेबाबतच्या अनुषंगाने संबंधितांकडून प्राप्त तपासणी अहवालाची छायांकित प्रत मा.स्थायी समितीच्या सदस्यांना अवलोकनार्थ उपलब्ध करुन देण्याची व्यवस्था करणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/उद्यान/से/१५०५ दि. २७/२/२००९ चे पत्र.

**विषय क्रं. २२८३**

दि. १६/२/२००९ ते दि. २२/२/२००९ अखेर संपणाऱ्या आठवड्यात पुणे म.न.पा.च्या हद्दीत लागलेल्या एकुण ३४ आगींबाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांनी पत्र क्र. मआ/अशाद/१५१० दि. ४/३/२००९ ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

**विषय क्रं. २२८४**

दि. २३/२/२००९ ते दि. १/३/२००९ अखेर संपणाऱ्या आठवड्यात पुणे म.न.पा.च्या हद्दीत लागलेल्या एकुण ३४ आगींबाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांनी पत्र क्र. मआ/अशाद/१५११ दि. ४/३/२००९ ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

UnRegistered

## हिशोब तपासणी अहवाल

**विषय क्रं. २२८५**

विकास योजना विभागाच्या सन २००८-०९ मधील ले-आऊट प्रकरणांची तपासणी केली असता आढळुन आलेल्या आक्षेपार्ह व दोषास्पद बाबींबाबत मा.मुख्य लेखापरिक्षक यांनी जा.क्रं मुलेप/८०५ दि. २४/२/२००९ ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्रं. ८१ सन २००८-२००९ चा विचारासाठी.

**विषय क्रं. २२८६**

कोथरुड कर्वेनगर एरंडवणा विभागाच्या सन २००८-०९ मधील ले-आऊट प्रकरणांची तपासणी केली असता आढळुन आलेल्या आक्षेपार्ह व दोषास्पद बाबींबाबत मा.मुख्य लेखापरिक्षक यांनी जा.क्रं मुलेप/८०६ दि. २४/२/२००९ ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्रं. ८२ सन २००८-२००९ चा विचारासाठी.

**विषय क्रं. २२८७**

आयातकर कार्यालयाकडील खातेदार मे.सी.टी.आर.मॅन्यु.कं.लि. यांनी सन २००५-०६ मध्ये आयात केलेल्या मालाच्या मासिक टिपणपत्र तकत्यांची हिशोब तपासणी केली असता आढळुन आलेल्या आक्षेपार्ह बाबींबाबत मा.मुख्य लेखापरिक्षक यांनी जा.क्रं मुलेप/७०७ दि. २४/२/२००९ ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्रं. ८३ सन २००८-२००९ चा विचारासाठी.

**विषय क्रं. २२८८**

मा.नगर अभियंता यांचे नियंत्रणाखालील बांधकाम खात्याकडील सन २००४–०५ ते सन २००६–०७ मध्ये बांधकाम प्रकरणी देणेत आलेल्या भोगवटा प्रकरणांची तपासणी (वडगांव शेरी स.नं. १३/१/२/३ व स.नं. १४(पार्ट) (कुमार सिटी)) केली असता आढळुन आलेल्या आक्षेपार्ह बाबींबाबत मा.मुख्य लेखापरिक्षक यांनी जा.क्रं मुलेप/८२० दि. ३/३/२००९ ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्रं. ८४ सन २००८–२००९ चा विचारासाठी.

## सेवकवर्गाची प्रकरणे

**विषय क्र. २२८९**

श्री.मधुकर बाळकृष्ण पऱ्हाड, हुद्या–मोकादम (आरोग्य) यांच्या निलंबन काळास दि. २६/११/२००८ रोजी दुसरी सहामाही पूर्ण झाली असल्याने सदरची बाब मनपा सेवानियम क्र. ५८ नुसार निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र. मआ/आरोग्य/१५१३ दि. ४/३/२००९ चे पत्र.

## ठरावान्वये आलेले अभिप्राय

**विषय क्रं. २२९०**

येरवडा शादल बाबा ते डेक्कन कॉर्नर या रस्तारुंदीकरणामध्ये बाधित स्टॉलधारकांचे पुनर्वसन त्याच रस्त्यावर गाळे बांधून करणेबाबत मा.संजय भोसले व मा.दिपक गावडे यांचे दि. ३/११/२००८ चे पत्रावर झालेला स्थायी समिती ठराव क्र. १२९२ दि. ११/११/२००८ ला अनुसरुन मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/उआ(वि)/१४६२ दि. २४/२/२००९ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

## सर्वात कमी रक्कमेची टेंडर्स

**विषय क्रं. २२९१**

खराडी स.नं. ५०/१ब येथे मल्टीपरपज हॉल व जिम्नॅशियम हॉल बांधणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडसपैकी ठेकेदार मे.सलीम कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. १,०६,२३,८१३=२५ पेक्षा १७.८६% जास्त) असल्याने त्यांचेकडून र.रु. १,२५,२१,२२६=३० अधिक बाजारभाववाढ सुत्रानुसार तसेच सिमेंट, लोखंड या मटेरियलचे निर्धारित केलेल्या बेसिक दरातील फरकानुसार होणाऱ्या वाढीव रकमेपर्यंत काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे क्र.मआ/भवन/१४८३ दि. २६/२/२००९ चे पत्र.

**विषय क्रं. २२९२**

वॉर्ड क्र. १०५, १०६ अलंकार पोलिस चौकी ते नाईक पुलापर्यंत नाल्यामध्ये ९०० मिमी व्यासाची एनपी–३ आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडसपैकी ठेकेदार मे.सनराज कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ४०,९९,९८७/– पेक्षा १५% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ३४,८४,९८८=९५ अधिक भाववाढ व विशेष भाववाढ (स्टार रेट) सुत्रानुसार होणाऱ्या रकमेपर्यंत काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे क्र.मआ/मलनि/प्र/१४८७ दि. २६/२/२००९ चे पत्र.

**विषय क्रं. २२९३**

पुणे महानगरपालिका हद्दीमध्ये स्त्रियांसाठी व पुरुषांसाठी फायबर मुताऱ्या बांधणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडसपैकी ठेकेदार एम.एस.एस.आय.डी.सी.लि. यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ४५,५६,७९५=०३ पेक्षा ०.५% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ४५,३४,०११=०३ पर्यंत काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे क्र.मआ/गवनि/१४८८ दि. २६/२/२००९ चे पत्र.

Unregistered

**विषय क्रं. २२९४**

उरळी देवाची कचरा डेपो येथे विविध विकास कामे व सिमाभिंत बांधणे फेज–३ कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडसपैकी ठेकेदार मे.एस.व्ही.एंटरप्रायझेस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ९५,४०,७३९/– पेक्षा १२.५१% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ८३,४७,१९२=५५ अधिक बाजारभाववाढ सुत्रानुसार तसेच सिमेंट, लोखंड या मटेरियलचे निर्धारित केलेल्या बेसिक दरातील प्रत्यक्ष फरकानुसार होणाऱ्या कमी वा अधिक (वाढीव) रकमेपर्यंत काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे क्र.मआ/भवन/१४८९ दि. २६/२/२००९ चे पत्र.

**विषय क्रं. २२९५**

घोरपडे येथील महर्षि म.अण्णासाहेब शिंदे प्राथमिक विद्यालय येथील शाळेची जुनी इमारत पाडून नविन इमारत बांधणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडसपैकी ठेकेदार राजेश कदम यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ६८,०३,२९८/– पेक्षा ९.५४% जास्त)(तडजोडीने) असल्याने त्यांचेकडून र.रु. ७४,५२,३३२=६२ अधिक बाजारभाववाढ सुत्रानुसार तसेच सिमेंट, लोखंड या मटेरियलचे निर्धारित केलेल्या बेसिक दरातील फरकानुसार होणाऱ्या वाढीव रकमेपर्यंत काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे क्र.मआ/भवन/१४९३ दि. २६/२/२००९ चे पत्र.

**विषय क्रं. २२९६**

एस.एन.डी.टी.कोथरुड झोनमधील ठिकठिकाणचे जुने व नादुरुस्त स्लुईस व्हॉल्व्हज बदलणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडसपैकी ठेकेदार श्री.बी.एस.कलमाणी यांचे टेंडर दोघात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. १९,९८,६४५/– पेक्षा २३.९९% जास्त) असल्याने त्यांचेकडून र.रु. २४,७८,११९=९४ पर्यंत काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे क्र.मआ/पापु/१५०९ दि. २/३/२००९ चे पत्र.

**एकच टेंडर प्रकरणे**

**विषय क्रं. २२९७**

पर्वती जनता वसाहत डोंगरावरील भागाचा पाणीपुरवठा सुधारणेच्या दृष्टीने एम.एस.जलवाहिनी टाकणे कामी टेंडर्स मागविली असता ठेकेदार मे.श्रीस्वामी गोविंदा कन्स्ट्रक्शन यांचे एकच टेंडर आले (टेंडर र.रु. ९,९९,७९०/– पेक्षा २९% जास्त)(तडजोडीने) असल्याने त्यांचेकडून र.रु. १२,८९,७२९=१० चे काम उपलब्ध रकमेपर्यंत करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे क्र.मआ/पापु/१५०८ दि. २/३/२००९ चे पत्र.

**सर्वात जास्त रकमेची टेंडर्स**

**विषय क्र. २२९८**

पं.नेहरु स्टेडियम येथील हॉटेल सारस रेस्टॉरंट, २१ निवासी खोल्या, १ कॉन्फरन्स हॉल लिव्ह ॲण्ड लायसेन्स या तत्वावर दरमहा भाडे र.रुपये १,२९,४१३/– प्रथम वर्षासाठी निर्धारित करुन व त्यानंतर प्रतिवर्षी १२% भाडेवाढ प्रस्तुत करुन ५ वर्षे चालविण्यास देणेकरीता निविदा मागविल्या असता आलेल्या ३ निविदांपैकी सर्वात जास्त रक्कमेची निविदा देणारे श्री.सतिश शेट्टी (विनय केटरर्स) यांना पाच वर्षाकरीता लिव्ह ॲण्ड लायसेन्स तत्वावर दरमहा र.रुपये २,००,०५३/– प्रथम वर्षी व त्यानंतर पुढील प्रत्येक वर्षी १२% भाडेवाढ करुन देण्यास तसेच मा.मुख्य सभा मान्यता देईल त्या दिनांकापासून अगर प्रत्यक्ष ताबा दिनांकापासून त्यांचेबरोबर करार करणेस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/उआ(सक)/१५०६ दि. २७/२/२००९ चे पत्र.

**मागील सभेचे विषय**

**विषय क्र. २२९९**

मा.विरेंद्र किराड व मा.अशोक येनपुरे यांचे दि. ९/१/२००९ चे पत्र.

स्थायी समिती ठराव क्र. १८३७ दि. ६/१/२००९ चा फेरविचार करण्यात यावा. (आकाशचिन्ह व जाहिरात फलक यांच्या फी चे दरात वाढ करणेबाबत)

सदर ठरावाचा फेरविचार होईपर्यंत मा.महापालिका आयुक्त यांनी कार्यवाही करु नये तसेच सदरचा ठराव १ के खाली मा.मुख्य सभेत दाखल करु नये.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. २६/२/२००९ च्या सभेत ठरले होते.)

Unregistered

## संकिर्ण

**विषय क्र. २३००**

पुणे महानगरपालिका क्षेत्रातील मुलभूत विकास कामांसाठी बँक ऑफ महाराष्ट्र, बाजीराव रोड शाखा, पुणे यांचेकडून सन २००५–२००६ मधील मंजूर कर्ज र.रुपये २०० कोटीपैकी उर्वरित न उचललेले कर्ज र.रुपये १०० कोटी उचलणेस तसेच रुपये १७६,४६,५०,०००/– चे कर्ज उभारण्यासाठी खालील बाबीस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/मुले/१४४९ दि. २४/२/२००९ चे पत्र.

१) सन २००५–०६ या वित्तीय वर्षात बँक ऑफ महाराष्ट्र बाजीराव रोड शाखा पुणे यांचेकडून मा.मुख्य सभा व मे.राज्य शासनाने दिलेल्या मान्यतेनुसार मान्य कर्ज र.रुपये २०० कोटीपैकी उर्वरित न उचललेले कर्ज र.रुपये १०० कोटी तीन वर्ष पूर्ण झाल्याने नविन कर्ज **(Fresh Term Loan)** या स्वरुपात सद्यपरिस्थितीतील विद्यमान बाजारदराने बी.पी.एल.आर.दर वजा १% = ११.७५% द.सा.द.शे. या व्याजदराने तसेच भविष्यात बीपीएल आर दर वजा १% द.सा.द.शे. यानुसार येणाऱ्या बदलत्या व्याजदरानुसार उचलणेस

२) पुणे महानगरपालिका क्षेत्रातील मुलभूत विकास कामांसाठी बँक ऑफ महाराष्ट्र, बाजीराव रोड शाखा, पुणे यांच्या दि. २९ डिसेंबर २००८ च्या पत्रातील अटी व शर्ती स्विकारुन त्यांचेकडून बीपीएलआर.दर वजा १% = ११.७५% द.सा.द.शे. (सध्याचा बीपीएलआर दर १२.७५%) व्याजदराने तसेच बदलत्या बीपीएलआर दर वजा १% द.सा.द.शे. यानुसार येणाऱ्या बदलत्या व्याजदरानुसार र.रुपये १,७६,४६,५०,०००/– चे कर्ज उभारणेस व मे.राज्य शासनाची मान्यता घेण्यास

३) सदरचे कर्ज वित्तीय आवश्यकतेनुसार उचलणेस

**विषय क्रं. २३०१**

अनधिकृत बांधकाम व अतिक्रमणे काढणाऱ्या मनपा सेवकांच्या संरक्षणासाठी असलेल्या पोलिस दलाचे थकीत वेतन अदा करणेकामी सन २००८–०९ च्या अंदाजपत्रकातील मान्य तरतुदीमधून र.रुपये १,३१,४१,७६५/– लाखाचे वर्गीकरण १५.ख.पदपथावरील अतिक्रमण काढणे ठेकेदार पध्दतीने बिगारी पुरविणे (आर ई २५बी १०६) या खात्यातून १५.ख.पथावरील अतिक्रमणे काढणे, २.पोलिस खर्च (आरई २५बी १०२) या खात्याकडे वर्ग करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे क्रं. मआ/विका(अतिक्रमण)/१४८५ दि. २६/२/२००९ चे पत्र.

**विषय क्र. २३०२**

केंद्र शासन अनुदानित प्रकल्पाअंतर्गत काम करुन घेणारे मे.एन.बी.सी.सी.यांचेसमवेत सामंजस्य करार **(Memorandom of Understanding)** करणेस व प्रकल्प राबविणेस मे.हंजर बायोटेक एनर्जीस प्रा.लि. यांचेबरोबर सवलतीचा करारनामा **(Concession Agreememt)** करणेस व ५ वर्षाचे कालावधीनंतर त्यांना लँडफिल डेव्हलपमेंट व लँडफिल मेन्टेनन्स पोटी फी अदा करणेसाठी खालील बाबीस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/एचओ/१४९९ दि. २६/२/२००९ चे पत्र.

१) मे.एन.बी.सी.सी.या संस्थेची केंद्र शासनाने घनकचरा व्यवस्थापनाअंतर्गत करावयाच्या कामांसाठी नेमणूक केलेली असल्याने त्यांचेबरोबर सामंजस्य करार **(Memorandom of Understanding)** करणे

२) मे.हंजर बायोटेक एनर्जीस प्रा.लि. या कंपनीबरोबर मे.एन.बी.सी.सी.यांनी मागविलेल्या निविदातील अटी व शर्तीनुसार सवलतीचा करारनामा करणे व प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर ५ वर्षे कालावधीसाठी त्यांचेकडून मोफत चालवून घेणेस व त्यापुढील कालावधीसाठी नमूद केल्याप्रमाणे फी आदा करणेस

३) मे.हंजर बायोटेक एनर्जीस प्रा.लि. यांना लँडफिल डेव्हलपमेंट व लँडफिल मेन्टेनन्स पोटी मनपाने प्रक्रियेसाठी खालीलप्रमाणे फी अदा करणेस

| अ.क्र. | कालावधी | फी दर |
|---|---|---|
| १ | १ ते ५ वर्षे | नाही. |
| २ | ६ ते १० वर्षे | र.रुपये ५५/– प्रति मे.टन |
| ३ | ११ ते १५ वर्षे | र.रुपये ६०/– प्रति मे.टन |
| ४ | १६ ते २० वर्षे | र.रुपये ६७/– प्रति मे.टन |
| ५ | २१ ते २५ वर्षे | र.रुपये ७४/– प्रति मे.टन |
| ६ | २६ ते ३० वर्षे | र.रुपये ८२/– प्रति मे.टन |

UnRegistered

**विषय क्र. २३०३**

स्थायी समिती सभा प्रसंगी चहापान व खाद्यपदार्थ मागविण्यात आले असून त्याप्रित्यर्थ संबंधित बजेटहेडवर खर्ची टाकून संबंधितास बिले अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.उपनगरसचिव यांचे क्र. ५९१५ दि. ३/३/२००९ चे पत्र.

**विषय क्र. २३०४**

मा.महापौर, मा.अध्यक्ष, स्थायी समिती, मा.विरोधी पक्षनेते यांचे कार्यालयात चहापान मागविण्यात आले असून त्याप्रित्यर्थ संबंधित बजेटहेडवर खर्ची टाकून संबंधितास बिले अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.प्र.उपनगरसचिव यांचे क्र. ५९९० दि. ६/३/२००९ चे पत्र.

**सुनिल पारखी**
**उपनगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

**(टिप :– प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस) मा.नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)**

UnRegistered

## स्थायी समिती
## दाखल विषय – दि. १२/३/२००९

**विषय क्र. २३०५**

स्थायी समिती सभा प्रसंगी चहापान व खाद्यपदार्थ मागविण्यात आले असून त्याप्रित्यर्थ संबंधित बजेटहेडवर खर्ची टाकून संबंधितास बिले अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.उपनगरसचिव यांचे क्र. ६०१४ दि. १२/३/२००९ चे पत्र.

**विषय क्र. २३०६**

मा.मोहनसिंग राजपाल व मा.संदिप लडकत यांचे दि. १२/३/२००९ चे पत्र.

स्थायी समिती ठराव क्र. २२६१ दि. २६/२/२००९ चा फेरविचार (दारुवाला पूल ते दुधभट्टी नाल्यावर स्लॅब टाकणेबाबत) करण्यात यावा.

**विषय क्र. २३०७**

मा.हनिफ शेख व मा.ॲड्.अविनाश साळवे यांचे दि. १२/३/२००९ चे फेरविचाराचे पत्र.

स्थायी समिती ठराव क्र. २२८० दि. २६/२/२००९ चा फेरविचार करुन मुळ विषय मान्य (पुणे शहरातील शासकिय/निमशासकिय/मनपाच्या मालकिच्या मिळकतीवरील झोपडपट्टयांचे झोपडीधारकाच्या सहमतीने त्याच जागी नाविन्यपूर्ण पूर्नवसन–बीएसयुपी–जे एनएनयुआरएम अंतर्गत करणेबाबत) करण्यात यावा.

**विषय क्र. २३०८**

मा.विरेंद्र किराड, मा.ॲड्.अविनाश साळवे, मा.राजेंद्र वागसकर, मा.उज्ज्वल केसकर, मा.अशोक येनपुरे व मा.प्रा.सौ.मेधा कुलकर्णी यांचे दि. १२/३/२००९ चे पत्र.

आचारसंहिता सुरु झाल्यामुळे दि. ३१ मार्च २००९ पर्यंत २००८–०९ चे अंदाजपत्रकातील तरतुदीमुळे कामे होणे किंवा कामे सुरु होणे शक्य होणार नाही म्हणून सन २००८–०९ चे अंदाजपत्रकास दि. ३१ मार्च २००९ नंतर सहा महिने मुदतवाढ देण्यास मान्यता द्यावी. याची अंमलबजावणी करणे मा.महा.आयुक्तांना बंधनकारक राहील.

**विषय क्र. २३०९**

मा.अनिल भोसले, सभागृह नेता यांचे दि. १२/३/२००९ चे पत्र.

पुणे शहरात एखाद्या बिल्डींगला वीज पुरवठा करण्यासाठी व सबस्टेशन उभारण्यासाठी रस्ते खोदण्यासाठी रस्त्याचे क्षेत्र व किती किलोमिटर रस्ता खोदण्यात यावा याबाबत स्थायी समितीपुढे एक धोरण तयार करण्यास मान्यता देण्यात यावी. त्यानंतर रस्ते खोदण्यास परवानगी द्यावी. तोपर्यंत परवानगी देऊ नये.

UnRegistered

**सुनिल पारखी**
**उपनगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**